दैनिक आपल्या लोकांचा
# सत्यवादी
संपादक : शेख रेहान www.esatyawadi.com मो. 9822728340






स्वरा भास्करने जंतर मंतर येथे जाऊन सोनम वांगचुक यांची भेट घेतली आणि त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. अभिनेत्रीने नुकतीच 'द लल्लनटॉप'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने अनेक बॉलीवूड कलाकार या आंदोलनाबद्दल का व्यक्त होत नाहीत, त्यांनी सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला का पाठिंबा दिला नाही, याबद्दल मत व्यक्त केले आहे. ती म्हणाली, ''ते या आंदोलनाला पाठिंबा देत नाहीत. कारण- माझ्याबरोबर काय घडले हे त्यांनी पाहिले आहे. त्यांना माहीत आहे की, ते जर जास्त काही बोलले, तर जे स्वरा भास्करबरोबर घडलं ते त्यांच्याबरोबरही घडेल. त्यामुळे ते या आंदोलनापासून दूर आहेत.''

## दुनियादारी



### इराणची मोठी घोषणा; युद्ध पुन्हा भडकणार?

**तेहरान...**

अमेरिका-इराण संघर्ष दिवसेंदिवस आणखी वाढत चालल्याचं दिसून येत आहे. अमेरिका-इराणमधील शस्त्रसंधी संपुष्टात आल्याची घोषणा काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी केली होती. त्यानंतर दोन्ही देशातील संघर्षात पुन्हा एकदा वाढ झाली आहे. त्यामुळे याचा परिणाम होर्मुझ सामुद्रधुनीमध्येही होत असून याचा फटका जागतिक व्यापाराला बसत असल्याने अनेक देशांवर याचे गंभीर परिणाम होत आहेत. अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करार होण्यासाठी पाकिस्तानने देखील मध्यस्थी केली होती. २८ फेब्रुवारीपासून पश्चिम आशियात धगधगत असलेल्या युद्धाला त्यानंतर पूर्णविराम मिळाला होता. तसेच डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी या करारावर स्वाक्षऱ्याही केल्या होत्या. मात्र, आता अमेरिका-इराणमधील 'इस्लामाबाद सामंजस्य करार' मोडला असल्याची माहिती समोर येत आहे.

### सोनम वांगचुक यांचा उपचार घेण्यास नकार

**नवी दिल्ली...**

दिल्लीतील जंतर मंतर येथे २१ दिवसांपासून उपोषणावर बसलेल्या सोनम वांगचुक यांना शनिवारी सकाळी पोलिसांनी सफदरजंग रुग्णालयात नेले. रुग्णालय प्रशासनाने वांगचुक यांच्या शरीरातील पाणी कमी झाल्याचे (डिहायड्रेशन झाल्याचे) दोन बुलेटिन जारी केले, परंतु त्यांनी औषधोपचार घेण्यास नकार दिला. पेपरफुटी प्रकरणाची चौकशी आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वांगचुक उपोषणावर आहेत. त्यांची प्रकृती खालावत होती आणि त्यांचे वजन ९.५ किलोने कमी झाले होते.

### सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर अण्णा हजारेंनी सोडले मौन

**नगर..**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीत सुरू असलेल्या सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला आता एक नवे वळण मिळाले आहे. गेल्या २० दिवसांपासून या संवेदनशील विषयावर मौन बाळगून असलेले ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी अखेर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ''सरकारने वांगचुक यांच्या सहनशक्तीची परीक्षा घेऊ नये. त्यांच्या मागण्यांवर काय ते हो किंवा नाही असे स्पष्ट उत्तर द्यावे,'' अशा कडक शब्दांत अण्णा हजारे यांनी केंद्र सरकारला सुनावले आहे.



## भक्त आणि देवामध्ये बाकीच्यांनी पडू नये

# पुरुषोत्तमपुरीत अवतरला नारायण वाघ!

- देवाला बनावट चांदीचे दागिने अर्पण केले
- ट्रस्टी म्हणतात, शोधून काढणार
- दागिने खोटे पण श्रद्धा खरी, देवच न्याय करील



**बीड | सत्यवादी**

जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी मंदिराला एका भक्ताने तब्बल दीड किलो चांदीचे दागिने अर्पण केले. मात्र ते बनावट असल्याचा दावा ट्रस्टींनी केल्याने एकच खळबळ उडाली आहे. लोक आज पावला-पावलावर एकमेकांना फसवत आहेत, पण देवालाही फसवणारे काही महाभाग आहेत, हे सिद्ध झाले आहे. पुरुषोत्तमपुरीत खराखुरा नारायण वाघ येऊन गेल्याची चर्चा रंगली आहे. हे दागिने बनावट असल्याचा दावा करणारे ट्रस्टी त्या भक्ताचा शोध घेणार असल्याचे सांगितले जात आहे. तर दुसरीकडे, हा भक्त आणि देवाचा विषय आहे. त्याने अर्पण केलेले दागिने बनावट असले तरी श्रद्धा खरी, एवढ्या महागाईच्या काळात त्याने बनावट का असेना दागीने तर अर्पण केले, त्यालाही त्याने पैसेच खर्च केले असतील. त्यामुळे देवच त्याचा न्याय करील, भक्त आणि देव यांच्यामध्ये पडण्याचा प्रयत्न करु नये, अशीही चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

(पान २ वर...)

### तेच दागिने तपासले का?

*पुरुषोत्तमपुरी येथील पुरुषोत्तम मंदिराची नुकतीच यात्रा पार पडली. या दरम्यान घडलेल्या या घटनेची मोठी चर्चा झाली. अधिक मासात लाखो भाविकांनी येथे दर्शन घेतले आणि आपल्या कुवतीनुसार विविध प्रकारचे दान अर्पण केले. त्यात सोन्या-चांदीचे दागिनेही असण्याची शक्यता आहे. मग केवळ दीड किलो चांदीचे दागिनेच तपासण्यात आले का? की सर्व दागिन्यांची तपासणी करण्यात आली, आणि त्यात हे दागिने बनावट आढळले? याबाबत ट्रस्टींनी सविस्तर खुलासा करावा, अशी मागणी केली जात आहे.*

## केंद्र सरकारने एलआयसीचे खासगीकरण करु नये-सुळे

**मुंबई | सत्यवादी**

भारतीय आयुर्विमा महामंडळ म्हणजेच एलआयसीने देशवासीयांचा विश्वास संपादन केला आहे. सातत्याने चांगली कामगिरी करून नाव उंचावले आहे. सरकारच्या काही मोजक्या उपक्रमापैकी फायद्यात असलेला हा उपक्रम आहे. सरकारलाही आम्ही काहीतरी चांगले करतो आहे, असे सांगता येईल, असा हा उपक्रम आहे. त्यामुळे केंद्र सरकारने एलआयसीचे खासगीकरण करू नये, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी केले आहे. मुंबई येथे आयोजित ऑल इंडिया नॅशनल लाईफ इन्शुरन्स एम्प्लॉईज फेडरेशनच्या वर्किंग कमिटीच्या बैठकीत

(पान २ वर...)



## नोकरीचे आमिष दाखवून मामानेच भाच्याला १९ लाखांचा गंडा घातला

**केजमध्ये गुन्हा दाखल**

**बीड | सत्यवादी**

सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत सख्ख्या मामानेच आपल्या भाच्याची तब्बल १९ लाख रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध फसवणूक व विश्वासघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, परभणी येथील

(पान २ वर...)

### बेरोजगारीचा गैरफायदा

राज्यात वाढती बेरोजगारी आणि सरकारी नोकऱ्यांमधील मर्यादित संधी यामुळे अनेक युवक नोकरीच्या आमिषाला बळी पडत आहेत. या घटनेमुळे नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीबाबत सावध राहण्याचे आवाहन पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## सहा खासदारांचे शिंदे सेनेत विलिनीकरण मंजूर



**मुंबई | सत्यवादी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षासाठी मोठा राजकीय धक्का मानला जाणारा निर्णय लोकसभा सचिवालयाने घेतला आहे. ठाकरेंच्या पक्षातून वेगळा गट स्थापन करून

(पान २ वर...)

## नीट निकालावर पुन्हा गंभीर प्रश्नचिन्ह

# बीडच्या दोन विद्यार्थ्यांना ॲन्सर की नुसार ५००+ गुणांची अपेक्षा, निकालात मात्र ९५ आणि ८७ गुण

**बीड | सत्यवादी**

राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (नीट युजी) च्या पुनर्परीक्षेच्या निकालावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बीड जिल्ह्यातील दोन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) च्या मूल्यांकन प्रक्रियेवर गंभीर आरोप केले आहेत. अँसर कीनुसार ५०० हून अधिक गुण मिळण्याची अपेक्षा असताना अधिकृत निकालात अत्यंत कमी गुण दाखविण्यात आल्याचा दावा विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.


बीड शहरातील सोहम गवते याला अँसर की आणि ओएमआर शीटच्या आधारे सुमारे ५२२ गुण मिळतील, असा

(पान २ वर...)



## वृद्ध महिलेच्या गळ्यातील ३६ हजारांचे सोन्याचे दागिने लंपास

**माजलगाव | सत्यवादी**



माजलगाव येथील नवीन बसस्थानक परिसरात बसमध्ये चढत असताना एका ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना १५ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सखुबाई मुरलीधर गायकवाड (वय ७०, व्यवसाय घरकाम, रा. वाघोरा, ता. माजलगाव, जि. बीड) या नवीन बसस्थानक, माजलगाव येथून बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १२ ग्रॅम वजनाची सोन्याची १०० मणी व दोन डोरल्यांची पोत, अंदाजे ३६,००० किंमतीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी सखुबाई गायकवाड यांच्या

(पान २ वर...)

## भेसळीच्या दुधाचा काळाबाजार करणाऱ्यावर कारवाई

**बीड | सत्यवादी**

अन्न व औषध प्रशासन आयुक्त पदी तुकाराम मुंडे यांची नियुक्ती झाल्यापासून राज्यभर भेसळखोरावर कारवायाचा धडाका सुरू झाला आहे. राज्यात अनेक ठिकाणी दुधात तसेच इतर अन्नपदार्थात भेसळ करणारा वर मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या जात आहेत.

बीड शहरात पॅकिंग दूध कॅनमधील दुधात मिसळून

(पान २ वर...)

## खा.बजरंग सोनवणे करणार महामार्ग कामाची पाहणी

### तेलगाव-बीड राष्ट्रीय महामार्गातील अनेक कामे प्रलंबित

**बीड | सत्यवादी**




तेलगाव- बीड राष्ट्रीय महामार्गाच्या कामाबद्दल शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी येत असून महामार्गातील अनेक कामेही प्रलंबित आहेत. यामुळे आज दि.१९ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे हे स्वत: या कामाची पाहणी करणार आहेत. तसा दौरा देखील खा.सोनवणे यांच्या कार्यालयाकडून जाहिर करण्यात आला आहे.

या दौऱ्यात ते मुख्यत्वे तेलगाव ते बीड या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी व विविध गावांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधणार आहेत. खा.सोनवणे यांच्या या दौऱ्याची सुरुवात सकाळी ९.३० वाजता केज येथील पवनसुत निवास येथून

(पान २ वर...)

## कुमार सप्तर्षी यांचे निधन

**पुणे | सत्यवादी**



जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कुमार सप्तर्षी यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी पुण्यात निधन झाले. सप्तर्षी यांच्या निधनामुळे समाजवादी चळवळीतील एक महत्वाचा दुवा निखळला आहे.

वयाच्या ८५ व्या वर्षी पुण्यात त्यांनी आज सायंकाळी ५:३० वाजता अखेरचा श्वास घेतला. डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने महाराष्ट्रामधील सामाजिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे, त्याचबरोबर समाजवादी आणि गांधीवादी चळवळीमधील एक

(पान २ वर...)

## भोगलवाडी-काळाचीवाडी ग्रुप ग्रा.पं.च्या उपसरपंचपदी रामदास तिडके बिनविरोध

**धारूर | सत्यवादी**

भोगलवाडी-काळाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रामदास रामचंद्र तिडके यांची शुक्रवारी झालेल्या विशेष सभेत बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे ग्रामपंचायत परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच युवकांच्या वतीने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला.



ग्रामपंचायत कार्यालयात अधिकारी सह सरपंचांच्या

(पान २ वर...)

## सरकारला सत्तेची मस्ती जनताच जिरवणार-आमटे

### शेतकरी हक्क मोर्चा सोनम वांगचुक यांच्यासोबत

**बीड | सत्यवादी**



देशात लोकशाहीची वाटचाल हुकूमशाही कडे चाललेली आहे लेकराचे भविष्य घडवणाऱ्या नीट परीक्षेमध्ये भ्रष्टाचार करून अनेक लेकराच्या भविष्याचा वाटोळ करणाऱ्या शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात यावा याकरिता उपोषणाला बसलेल्या सोनम वांगचुक यांची उचल बांगडी करणे ही सरकारला असलेली सत्तेची मस्ती होय सरकारला असलेली सत्तेची मस्ती जनताच जिरवेल असे भावना

(पान २ वर...)

पान १ व ४ वरुन...

## पुरुषोत्तमपुरीत अवतरला

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे भारतातील एकमेव पुरुषोत्तमाचे मंदिर आहे. अधिक मासात येथे देशभरातून भक्त दर्शनासाठी येतात. महिनाभर येथे यात्रा भरते. भाविक दर्शनासाठी रांगा लावतात आणि देवाच्या चरणी दान अर्पण करतात. अनेक जण आपले नवस फेडण्यासाठी येथे येतात. जो नवस केला, ती वस्तू पुरुषोत्तमाच्या चरणी अर्पण करून नवस फेडला जातो. मात्र, यावेळी एक अजब घटना घडल्याने जिल्ह्यात गल्लीत गोंधळ, दिल्लीत मुजरा या चित्रपटातील नारायण वाघची आठवण झाली. या मराठी चित्रपटात मकरंद अनासपुरे यांनी नारायण वाघ हे पात्र साकारले आहे. त्यात ते एका नेत्याचा कार्यकर्ता आणि चमचा अशी भूमिका साकारतात. गावातील देवाला नारायण वाघ, ''मी आमदार झालो की तुला सोन्याची टोपी घालीन,'' असा नवस करतो. आश्चर्य म्हणजे साधा नारायण वाघ आमदार होतो. त्यानंतर तो दर्शनासाठी मंदिरात जातो. तेव्हा देव त्याला नवसाची आठवण करून देतो. त्यावर पक्का राजकारणी नारायण वाघ, ''मी विसरलो नाही,'' असे म्हणत चालाखीने सोन्या नावाच्या व्यक्तीला आवाज देतो आणि त्याच्या डोक्यातील टोपी काढून देवाच्या डोक्यावर ठेवतो. अशा प्रकारे तो नवस फेडतो आणि देवालाच टोपी घालतो.

असाच काहीसा प्रकार पुरुषोत्तमपुरीत घडल्याची चर्चा आहे. येथे एका भक्ताने मोठ्या थाटात दीड किलो चांदीचे दागिने अर्पण केले. मात्र ते दागिने बनावट असल्याचा दावा समोर आल्याने तो खराखुरा नारायण वाघ कोण, याची चर्चा आता जिल्हाभर सुरू झाली आहे. काहीजण भक्ताने देवालाच फसवल्याचे सांगत रोष व्यक्त करीत आहेत. तर ट्रस्टी त्या भक्ताचा शोध घेणार असल्याचे सांगत आहेत.

मात्र, हा विषय भक्ताच्या श्रद्धेचा आणि देवाचा आहे. हे कोणाचे कर्ज किंवा उसनी रक्कम परत करण्याचा व्यवहार नाही. त्यामुळे दागिने बनावट असले तरी त्याची श्रद्धा खरी असेल, तर देव आणि भक्त यांच्यातील तो विषय आहे, अशीही चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. हा अजब प्रकार समोर आल्याने तो जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला असून पुढे काय होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## वृद्ध महिलेच्या गळ्यातील

फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३९/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास माजलगाव शहर पोलीस करीत आहेत.

## खा.बजरंग सोनवणे

तेलगावकडे प्रस्थान करून होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता ते तेलगाव (ता.धारूर) येथे पोहोचतील. महामार्गाची पाहणी करत असताना ते सकाळी १०.१५ वाजता लोणवळ फाटा, १०.३० वाजता कुप्पा फाटा, १०.४५ वाजता उपळी गोलाई आणि ११.०० वाजता बावी (ता.वडवणी) येथे भेट देतील. यानंतर ११.१५ वाजता पुसरा/हिवरगव्हाण, ११.३० वाजता मोरवड दत्तमंदिर, तर ११.४५ वाजता बाहेगव्हाण फाटा येथे त्यांचे आगमन होईल. दुपारी १२.०० वाजता ते वडवणी शहरात दाखल होतील. त्यानंतर बीड तालुक्यातील मैंदा (दुपारी १२.१५), पोखरी फाटा (दुपारी १२.३०), घाटसावळी (दुपारी १२.४५) आणि डेकणमोहा येथे दुपारी १.०० वाजता भेट देऊन महामार्गाची पाहणी करतील. त्यानंतर बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे त्यांचा वेळ राखीव ठेवण्यात आला असून, सायंकाळी सोयीनुसार ते छत्रपती संभाजीनगरकडे रवाना होतील. खा.बजरंग सोनवणे यांच्या या धावत्या दौऱ्यामुळे महामार्गाच्या प्रश्नांना गती मिळण्याची चिन्हे असून स्थानिक नागरिकांमध्ये उत्सुकता आहे.

## भोगलवाडी-काळाचीवाडी

अध्यक्षतेखाली उपसरपदाच्या निवडीसाठी विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. नियमानुसार निवड प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात पार पडली. उपसरपंचपदासाठी रामदास रामचंद्र तिडके यांच्या नावाचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यास सर्व सदस्यांनी एकमताने पाठिंबा दिल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. निवडीची घोषणा होताच उपस्थित सदस्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.यानंतर समर्थकांनी पुष्पहार घालून, पुष्पगुच्छ देऊन तसेच पेढे वाटून आनंद व्यक्त केला. काही ठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करून नवनिर्वाचित उपसरपंचांचा जल्लोषात सत्कार करण्यात आला. या पूर्वी तुकाराम माणिक तिडके यांनी अडीच वर्षे उपसरपंच म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या कार्यकाळात ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांना गती मिळाली. प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधत ग्रामस्थांच्या समस्या सोडविणे, मूलभूत सुविधांचा विकास आणि लोकाभिमुख कारभार करण्यासाठी त्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे ग्रामस्थांनी यावेळी कौतुक केले.निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित उपसरपंच रामदास रामचंद्र तिडके यांनी ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाच्या विविध विकास योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचविणे, प्रलंबित विकासकामे पूर्ण करणे, पाणीपुरवठा, स्वच्छता, अंतर्गत रस्ते, शिक्षण, आरोग्य तसेच इतर मूलभूत सुविधांना प्राधान्य देऊन पारदर्शक, उत्तरदायी आणि लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.भोगलवाडी-काळाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या विकासाला नवी गती देण्यासाठी सर्व सदस्य, ग्रामस्थ आणि प्रशासन यांच्या समन्वयातून काम करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांचे सहकार्य घेऊन विकासाची नवी दिशा निर्माण करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले.दरम्यान, नवनिर्वाचित उपसरपंच रामदास तिडके यांचे ग्रामस्थ, माजी पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला बचतगटांच्या प्रतिनिधी तसेच युवकांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली भोगलवाडी-काळाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीचा विकास अधिक वेगाने होईल आणि नागरिकांच्या अपेक्षांनुसार विकासकामांना चालना मिळेल, असा विश्वास यावेळी अनेक मान्यवरांनी व्यक्त केला.

## सरकारला सत्तेची मस्ती

शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केल्या आहेत

देशाचा भवितव्य घडवणाऱ्या नीट परीक्षेत घोळ घालणाऱ्या दळभद्री शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान याचा राजीनामा घेणे ऐवजी सरकारने देशहितासाठी देशातील लेकराच्या भविष्यासाठी लढणाऱ्या सोनम वांगचुक यांची उचल बांगडी करणे ही अतिशय दुर्दैवी प्रकार आहे शेतकरी हक्क मोर्चा अशा या दुर्दैवी प्रकारचा जाहीर निषेध करतो व सोनम वांगचुक यांच्या लोकशाही लढा सोबत आहे असे शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी प्रसिद्धी पत्रक प्रसिद्धीस दिले आहे व झालेला प्रकार हा लोकशाहीसाठी अतिशय घातक आहे लोकशाहीची वाटचाल ही हुकूमशाही कडे चालवलेली आहे. देशामध्ये परीक्षेचे पेपर फुटतात नोकर भरतीचे पेपर तात चीन भारताची पंतप्रधान म्हणजे नरेंद्र मोदी आहे आणि नरेंद्र मोदी मुळे देशातील सर्वसामान्य सरकार वरील विश्वास उडालेला आहे यामुळे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने या घटनेचा जाहीर निषेध करून शेतकरी हक्क मोर्चा हा सोनम वांगचुक यांच्यासोबत आहे असे प्रसिद्धी पत्र शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांनी प्रसिद्ध दिले

## नोकरीचे आमिष दाखवून मामानेच

न्यायालयात लिपिक म्हणून कार्यरत असलेला दगडू हंगरगे याने आपला सख्खा भाचा अमोल मधुकर चिगुरे याला महसूल विभागात लिपिक तथा महसूल सहाय्यक पदावर नोकरी लावून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी त्याने १९ लाख रुपयांची मागणी केली.

मामावर विश्वास ठेवून अमोल चिगुरे यांनी ७ जून २०२२ आणि ५ जुलै २०२२ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या केज शाखेतून आरटीजीएसद्वारे रक्कम हस्तांतरित केली. त्यानंतर ८ जानेवारी २०२३ रोजी उर्वरित रक्कम रोख स्वरूपात दिली. अशा प्रकारे आरोपीने एकूण १९ लाख रुपये स्वीकारले.

मात्र, तीन वर्षांचा कालावधी उलटूनही नोकरी मिळाली नाही. वारंवार विचारणा करूनही आरोपीने केवळ खोटी आश्वासने दिली आणि पैसे परत करण्यास नकार दिल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर अमोल चिगुरे यांनी केज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी दगडू हंगरगे याच्याविरुद्ध फसवणूक व विश्वासघाताचे गुन्हे नोंदवले असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## नीट निकालावर पुन्हा गंभीर प्रश्नचिन्ह

विश्वास होता. मात्र, अधिकृत स्कोअरकार्डमध्ये त्याला अवघे ९५ गुण मिळाल्याचे दिसून आले. हा निकाल पाहिल्यानंतर संपूर्ण कुटुंबाला मोठा धक्का बसला.

सोहमच्या पालकांनी सांगितले की, मुलाने वर्षभर अत्यंत कठोर परिश्रम घेतले. अनेक दिवस कमी झोप, वेळेवर जेवण न करता केवळ डॉक्टर होण्याचे स्वप्न डोळ्यांसमोर ठेवून त्याने अभ्यास केला. मात्र, निकालातील तफावतीमुळे त्याची मेहनत वाया गेल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. न्याय न मिळाल्यास उच्च न्यायालयात धाव घेण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**दुसऱ्या विद्यार्थिनीचाही तसाच आरोप**

बीड जिल्ह्यातील वडवणी येथील ज्ञानेश्वरी पवार हिनेही अशाच प्रकारचा दावा केला आहे. अँसर कीनुसार ७०२ गुणांपेक्षा अधिक गुण मिळण्याची अपेक्षा असताना अधिकृत निकालात तिला केवळ ८७ गुण मिळाल्याचे स्कोअरकार्डमध्ये नमूद असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ज्ञानेश्वरीच्या कुटुंबीयांनीही ओएमआर शीटमध्ये तफावत असल्याचा दावा करत मूळ ओएमआर शीट प्रत्यक्ष दाखवण्याची मागणी केली आहे. तसेच आवश्यक असल्यास न्यायालयीन लढा देण्याची तयारीही दर्शवली आहे.

**एनटीएच्या मूल्यांकन प्रक्रियेवर प्रश्न**

नीट परीक्षेच्या पेपरफुटीच्या वादानंतर घेण्यात आलेल्या पुनर्परीक्षेच्या निकालावर आता गुणांतील कथित तफावतीमुळे नव्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. बीडमधील या दोन प्रकरणांमुळे एनटीएच्या मूल्यांकन प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, या विद्यार्थ्यांच्या आरोपांवर एनटीएकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. विद्यार्थ्यांच्या तक्रारींची सत्यता संबंधित तपास किंवा अधिकृत पडताळणीनंतरच स्पष्ट होणार आहे. मात्र, या प्रकरणामुळे देशभरातील लाखो नीट परीक्षार्थी आणि पालकांचे लक्ष आता एनटीएच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे.

## केंद्र सरकार एलआयसीचे

त्या बोलत होत्या.

एलआयसीवर आजही लोकांचा विश्वास आहे, म्हणूनच एक विश्वासाचे कायमचे नाते लोकांमध्ये तयार झाले आहे. पण, बदलत्या तंत्रज्ञानाचा अवलंब करत एलआयसीने देखील काही बदल केले पाहिजेत. पुढच्या ५० वर्षांचा विचार करून काही बदल करावे लागतील, त्यामुळे सरकारला सुद्धा आपला विचार बदलण्यासाठी आपण भाग पाडू शकतो. त्यामुळे आपल्या प्रतिस्पर्धी कंपन्यांपेक्षा आपल्याला आपली गती वाढवावी लागणार आहे, याचा विचार व्हावा, असेही सुळे म्हणाल्या. मी खासगीकरणाच्या विरोधात नाही पण, एलआयसीची कामगिरी चांगली राहिलेली आहे, त्यामुळे त्यांचे खासगीकरण होऊ नये. एलआयसीच्या ज्या काही मागण्या आहेत, त्या संसदेत उपस्थित करू. एलआयसीच्या शिष्टमंडळाने भाजप खासदारांचीही भेट घ्यावी, तेही जनतेचे प्रतिनिधी आहेत, त्यांचा याला विरोध आहे, असे आपण न समजता त्यांना देखील आपल्या मागण्या सांगितल्या पाहिजेत. आपण एलआयसीसाठी एक देशव्यापी चळवळ उभी केली पाहिजे. सत्ताधारी लोकप्रतिनिधीसुद्धा आपल्या मागण्यांना पाठिंबा देऊ शकतात त्यामुळे आपण त्यांच्याकडे देखील या बाबत पाठपुरावा करू, असेही सुळे म्हणाल्या. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याशी चर्चा करू. एलआयसीला सुरक्षित करण्यासाठी सरकारचे काय धोरण आहे, या बाबत संसदेत प्रश्न उपस्थित करणार आहे. एलआयसी वाचवण्यासाठी आपण सरकारला देखील सोबत घेऊ. संघर्षाच्या काळात आम्ही कायम आपल्या सोबत राहू, असा विश्वास ही सुप्रिया सुळे यांनी उपस्थितांना दिला. या प्रसंगी ऑल इंडिया नॅशनल लाईफ इन्शुरन्स एम्प्लॉईज फेडरेशनच्या वर्किंग कमिटीचे नरसिंहम, संजय चक्रवर्ती, सुभाष मोरे, राजेंद्र मोहिते यांच्यासह एम्प्लॉईज फेडरेशनचे पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

## सहा खासदारांचे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देणाऱ्या सहा खासदारांच्या विलिनीकरणाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे या सहा खासदारांची खासदारकी कायम झाली असून, आगामी राजकीय घडामोडींवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.राहणार असून ते आता अधिकृतपणे शिंदे शिवसेनेचे खासदार म्हणून लोकसभेत कामकाज करतील. लोकसभा निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेले ओमराजे निंबाळकर, संजय दिना पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे आणि नागेश पाटील आष्टीकर यांनी प्रथम स्वतंत्र गटाची स्थापना केली होती. त्यानंतर या गटाने शिंदे शिवसेनेत विलीन होण्याचा निर्णय घेतला. या विलिनीकरणाला अखेर लोकसभा सचिवालयाने अधिकृत मान्यता दिली.

या निर्णयाला विरोध करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने संबंधित सहा खासदारांना अपात्र ठरविण्याची मागणी लोकसभा अध्यक्षांकडे केली होती. मात्र ही मागणी फेटाळण्यात आल्याने सहाही खासदारांची सदस्यता कायम राहिली आहे.

निर्णयानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया देताना, ''या खासदारांनी मतदारसंघाच्या विकासासाठी आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या मतदारसंघांना विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल,'' असे सांगितले.

**ठाकरेंच्या पक्षासमोर नवे आव्हान**

या घडामोडीनंतर लोकसभेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे केवळ तीन खासदार उरले आहेत. त्यामुळे लोकसभेतील पक्षाच्या कार्यालयाच्या मान्यतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संसदेतील मान्यताप्राप्त पक्ष कार्यालयासाठी आवश्यक असलेल्या सदस्यसंख्येचा निकष पूर्ण न झाल्यास पक्षाचे कार्यालय काढून घेतले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा शिवसेनेतील सत्तासंघर्ष आणि पक्षीय समीकरणांवर चर्चा सुरू झाली आहे.

## कुमार सप्तर्षी यांचे निधन

महत्वाचा आवाज देशाने गमावला आहे. डॉ. सप्तर्षी यांना मधुमेहाचा त्रास होत होता त्यामुळे आज सकाळी त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्यानंतर त्यांना लगेचच पुण्याच्या रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले.

रुग्णालयामध्ये उपचाराच्या दरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मिळालेल्या माहितीनुसार २० जुलै रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यत त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी गांधी भवन येथे ठेवलं जाणार आहे. त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. डॉ. कुमार सप्तर्षी यांना आज अचानक अस्वस्थ वाटू लागल्यानंतर त्यांना लगेचच पुण्यामधील एरंडवणे येथील जोशी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या निधनाची बातमी महाराष्ट्राला समजताच विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि त्यांच्या असंख्य अनुयायांनी शोक व्यक्त केला आहे.

## भेसळीच्या दुधाचा काळाबाजार

नागरिकांना विक्री करणाऱ्या दूध विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. मागील आठवड्यात बार्शी नाका,परळी रोड, कोल्हारवाडी फाटा,खजाना विहीर परिसरातील काही दूध विक्रेते विनापरवाना बंद पॅकेटमधील दूध फोडून ते कॅनमधील दुधात मिसळत असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अन्न व औषध प्रशासन खडबडून जागे झाले. व्हायरल झालेल्या व्हिडिओंमुळे काही दूध विक्रेते पॅकिंग दुधाचा वापर करून ग्राहकांची दिशाभूल करत असल्याचे स्पष्ट झाले होते. काही बंद पुढयावर पॅकिंगवरील कंपनीचे नाव,उत्पादन दिनांक, कालबाह्यता (एक्सपायरी) दिनांक तसेच फॅटची माहिती नसल्याची बाबही समोर आली. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची चर्चा होती. बीड /परळी रोडवरील मोची पिंपळगाव,कोल्हारवाडी फाटा आणि आहेरवडगाव परिसरात सकाळी ६ ते ८ या वेळेत काही दूध विक्रेते पॅकिंग दूध कॅनमध्ये मिसळत असल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत बीड अन्न व औषध अधिकाऱ्यांनी दिनांक १८ जुलै शनिवार रोजी सकाळी सहा वाजता परळी रोडवरील मोची पिंपळगाव येथे कारवाई करत दोन विक्रेत्याकडे दूध विक्री बाबत परवाना विचारला असता त्यांच्याकडे दूध पुढे विकायचा परवाना किंवा बिल नसल्याने सुमारे २०० दूध पिशव्या नष्ट केल्या. यावेळी अनेक भेसळ करणारे दूध वाल्यांनी त्या ठिकाणाहून पळ काढला. या ठिकाणच्या दुधाचे नमुने (सॅम्पल) तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. या कारवाईनंतर संबंधित परिसरातील दूध विक्रेत्यांमध्ये एकच खळबळ उडाली. या कारवाईची माहिती बीड शहरातील इतर भेसळखोरांना मिळतात त्यांनी तात्काळ अशा विनापरवाना बंद पॅकेट मधील दूध विक्री बंद झाली.

## प्रवाशांच्या सेवेसाठी एसटीचे एक

गरजेचे आहे असे मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरात आता दूरदूर पर्यंत नागरी वसाहती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. वाढलेल्या अंतरामुळे प्रवाशांना गावी जाताना एसटी बस स्थानकात जाऊन बस पकडण्यासाठी जास्तीचा वेळ आणि खर्च होत होता. ही बाब लक्षात घेऊन एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनी प्रवाशांची सोय व्हावी याकरिता जिल्हा रुग्णालय आणि शिवाजीनगर पोलीस ठाणे लगत बार्शी रोडवर अधिकृत बस थांबा सुरू केला आहे. येथे बार्शी रोड आणि तेलगाव रोड कडे जाणारी प्रत्येक एसटी बस थांबणार आहे. यासाठी इथे एक वाहतूक नियंत्रकाची नियुक्ती ही करण्यात आली असून त्यांच्यासाठी एक पत्र्याचे कॅबिन सुद्धा ठेवण्यात आले आहे. येथून जाताना आता एकही बस इथे थांबा घेतल्याशिवाय पुढे जाणार नाही असे नियोजन करण्यात आले आहे. एसटी महामंडळाने प्रवाशांच्या सेवेसाठी एक पाऊल पुढे टाकले असून बसची वाट पाहत उभे राहिलेल्या प्रवाशांसाठी आता बीड नगर परिषदेने किंवा बी अँड सी ने येथे एक पत्र्याचे शेड उभारणे गरजेचे आहे. असे या थांब्याची पाहणी करताना मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले असून यावेळी एसटीचे सुरक्षा व दक्षता अधिकारी रणजीत यादव, वाहतूक नियंत्रक महेश भावसार आणि अनेक प्रवाशांची उपस्थिती होती.

## सकल मातंग समाजाची

सकारात्मक चर्चा केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान राखत, राज्य सरकारने तातडीने या विषयावर कॅबिनेटमध्ये चर्चा करून उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करावी, अशी आग्रही विनंती करण्यात आली. या निर्णयामुळे आरक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांना न्याय मिळेल, असा विश्वासही शिष्टमंडळाने व्यक्त केला.

यावेळी सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक तथा प्रदेश उपाध्यक्ष भाजपा अनुसूचित मोर्चा अनिल चांदणे,आरक्षण अभ्यासक अडव्होकेट सुनिलसुतार,परळी तालुकाध्यक्ष भाजपा अनु जाती मोर्चा विक्रम मिसाळ, लालासाहेब दुनघव, विलास भिसे, लक्ष्मण पाटोळे, सुनिल मस्के,अभिमान मस्के,आकाश चव्हाण,मुन्ना मस्के, हनुमंत गायकवाड, सुधाकर काळुंखे, गोपाळ कांबळे, बबन कसबे, गोपाळ वैराळ, कमलाकर मिसाळ, संदीपान हजारे, यांच्यासह बीड जिल्ह्यातील सकल मातंग समाजाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ.सुरेश धस यांच्या पुढाकारातून

वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षात सहाय्यक विनोद वाघ यांनी प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा केला. सुधारित नियमानुसार प्रथम टप्प्यात १५ हजारांची मदत मंजूर करण्यात आली. त्यानंतर उपयोगिता प्रमाणपत्र सादर झाल्यानंतर उर्वरित ३५ हजारांचा निधी मंजूर झाला. अशा प्रकारे एकूण ५० हजारांची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून थेट भगवंत हॉस्पिटलच्या खात्यावर विजयकुमार गवळी यांच्या उपचारासाठी जमा करण्यात आली. या आर्थिक मदतीमुळे उपचाराचा मोठा भार हलका झाल्याने गवळी कुटुंबाला दिलासा मिळाला. याबद्दल विजयकुमार गवळी यांचे चिरंजीव तुषार गवळी यांनी लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस तसेच त्यांच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी विशेषतः ड. महेश बेदरे, स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे आणि मुंबई कक्षातील विनोद वाघ यांनी केलेल्या तत्पर पाठपुराव्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## माजलगाव नगराध्यक्षांच्या जात वैधता

मांडत रिट याचिका दाखल केली आहे.

प्राथमिक सुनावणीदरम्यान माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याचिकेची दखल घेत संबंधित प्रतिवादींना नोटिसा बजावण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता संबंधित पक्षांना न्यायालयासमोर आपली भूमिका मांडण्याची संधी मिळणार असून, त्यानंतर पुढील सुनावणीमध्ये प्रकरणावर अधिक सुनावणी होणार आहे. या प्रकरणाकडे माजलगाव शहरासह जिल्ह्याचे लक्ष लागले असून, अंतिम निर्णय माननीय उच्च न्यायालयाकडून होणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील याचिकेत करण्यात आलेले आरोप हे सध्या न्यायालयीन विचाराधीन असून त्याबाबत कोणताही अंतिम निष्कर्ष अद्याप निघालेला नाही.

**संबंधित जातवैधता अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात यावी – माजी नगरसेवक खलील पटेल**

माजलगाव नगरपालिकेच्या नगराध्यक्षांच्या जातवैधता प्रमाणपत्रासंदर्भातील प्रकरण न्यायालयात प्रलंबित असताना, या प्रमाणपत्राची पडताळणी करणाऱ्या संबंधित जातवैधता समिती आणि प्रक्रियेशी संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक खलील पटेल यांनी केली आहे.

खलील पटेल यांनी म्हटले की, जातवैधता प्रमाणपत्र देताना सर्व कायदेशीर निकष, शासनाचे नियम आणि आवश्यक कागदपत्रांची योग्य पडताळणी झाली होती का, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशीत कोणत्याही प्रकारची निष्काळजीपणा, नियमांचे उल्लंघन किंवा अन्य अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कायद्यानुसार योग्य कारवाई करण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली.

या प्रकरणी माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल असून न्यायालयाने संबंधित प्रतिवादींना नोटिसा बजावल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाचा अंतिम निर्णय न्यायालयाकडून होणार असून, न्यायालयाच्या निर्णयाचा सर्वांनी आदर करावा, असेही खलील पटेल यांनी नमूद केले.

## छाया पांचाळ ते मुस्कान; जिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान

हलगर्जीपणामुळे प्रसूतीदरम्यान छाया गणेश पांचाळ तसेच अलीकडील मुस्कान यांच्या मृत्यूची प्रकरणे घडली असून, संबंधितांवर अद्याप गुन्हे दाखल झालेले नाहीत. समित्यांवर समित्या नेमून वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. छाया गणेश पांचाळ व मुस्कान मृत्यूप्रकरणी संबंधित दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. चौकशीच्या नावाखाली होत असलेल्या दिरंगाईबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी. संबंधित चौकशी समित्यांची निष्पक्ष पुनर्रचना करावी. मृत्यू प्रकरणांतील जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करावी.

**२४ कोटींच्या माता-बाल रुग्णालयातील त्रुटींची चौकशीची मागणी**

डॉ. ढवळे यांनी निवेदनात २४ कोटी रुपये खर्चून उभारलेल्या माता व बाल रुग्णालयातील कथित त्रुटींकडेही लक्ष वेधले आहे. इमारतीला गळती लागणे, वारंवार लिफ्ट बंद पडणे, स्ट्रेचर सुविधेचा अभाव, रुग्णांना नातेवाईकांकडून उचलून न्यावे लागणे, तसेच बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी करून कंत्राटदार व संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## किरण गित्ते आयएएस यांची मुख्यमंत्र्यांचे सचिव

विभाग आणि उद्योग व वाणिज्य यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या खात्यांच्या सचिवपदाची धुरा देण्यात आली आहे. तसेच 'त्रिपुरा इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' च्या मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) पदाचा अतिरिक्त प्रभारही त्यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

परळीसारख्या ग्रामीण भागातून जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर प्रशासकीय सेवेत सर्वोच्च पदावर पोहोचलेल्या किरण गित्ते साहेब यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा नेहमीच उमटवला आहे. एकाच वेळी राज्याचे मुख्यमंत्री सचिवालय, आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम यांसारखी महत्त्वाची आणि वजनदार खाती सांभाळण्याची जबाबदारी मिळाल्याने त्रिपुराच्या प्रशासनात त्यांचे वर्चस्व अधिक वाढले असल्याचे स्पष्ट होत आहे. त्रिपुराच्या राज्यपालांच्या स्वाक्षरीने निघालेल्या या अधिकृत आदेशानंतर, परळीच्या सुपुत्राला मिळालेल्या या बहुमानाबद्दल परळी वैजनाथ परिसरासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील नागरिक, राजकीय, सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिमानाने कौतुक होत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा

दि. २० जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वा जिल्हाधिकारी कार्यालय,बीड समोर येथे धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली. राज्यात स्पर्धा परीक्षांचे वारंवार पेपर फुटणे, भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी तसेच पोलीस भरती प्रक्रियेतील कथित अन्याय यामुळे लाखो विद्यार्थी व युवकांचे भविष्य धोक्यात आले आहे. या गंभीर प्रश्नांवर केंद्र सरकारकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याने विद्यार्थी, युवक व पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे. तसेच विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांवर सामाजिक कार्यकर्ते श्री. सोनम वांगचुक यांनी दिल्ली येथे सुरू केलेल्या उपोषण आंदोलनाची दखलही केंद्र सरकारने घेतलेली नाही. उलट हे आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व खालील मागण्यांसाठी बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे. या धरणे आंदोलनातून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, ब्लॅकलिस्ट करण्यात आलेल्या कंपन्या व त्यांच्या संचालकांशी संबंधित संस्थांना कोणत्याही प्रकारची शासकीय कामे देऊ नयेत, राष्ट्रीय परीक्षा संस्था (छढ-) व संबंधित विभागांची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई करावी, ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून पारदर्शक, विश्वासार्ह व भ्रष्टाचारमुक्त परीक्षा प्रणाली लागू करावी, पोलीस भरती प्रक्रियेतील कथित अन्याय दूर करून पात्र उमेदवारांना न्याय द्यावा, विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांवर तातडीने ठोस निर्णय जाहीर करावेत, तसेच महाराष्ट्रातील सर्व स्पर्धा परीक्षा ऑनलाइन न घेता कायमस्वरूपी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात येत आहेत. हे धरणे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने करण्यात येणार असून, विद्यार्थी, युवक, पालक, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन विद्यार्थी-युवकांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठवावा, असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

## योजना वारीद्वारे शासकीय योजना व

लाभ प्रत्येक पात्र कुटुंबापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे संस्थेच्या प्रतिनिधींनी सांगितले.ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा जनजागृती कार्यक्रमांची गावागावांत नियमितपणे आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये शासकीय योजनांबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच ग्रामविकास प्रक्रियेत लोकसहभाग वाढण्यास निश्चितच मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## मुख्यमंत्री

४६ लाख शेतकरी कुटुंबांना थेट लाभ होणार असून, हा निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा आणि शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविणारा आहे, असेही शंकर देशमुख यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने शेतकरी कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, हा निर्णय त्याच धोरणाचा महत्त्वपूर्ण भाग असल्याचे देशमुख यांनी सांगितले. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करून राज्यातील सर्व शेतकरी बांधवांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त केले.


ACC AVISHKAR
Coaching Classes
10th Summer+Regular+ Special NTSE Batch With Pre NEET/JEE Foundation
9th Basic Foundation +Regular With Pre NEET/JEE Foundation
8th Scholarship+Basic Foundation +Regular With Pre NEET/JEE Foundation
7th Basic Batch+Regular
6th Basic Batch+Regular
5th Scholarship+ Navodaya +Regular
Medium
SEMI
CBSE
ICSE
Subjects
English
Mathematics
Science
Sanskrit
•Contact•
7722080501
7722080503

# केसापुरी येथे घरावर छापा; प्रतिबंधित गुटखा व तंबाखूचा साठा जप्त

**माजलगाव । सत्यवादी**

माजलगाव तालुक्यातील केसापुरी येथे एका घरावर छापा टाकून महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ जुलै २०२६ रोजी दुपारी १.५५ वाजण्याच्या सुमारास केसापुरी येथे लक्ष्मीकांत शिवाजी दिवटे (वय २९, रा.केसापुरी, ता. माजलगाव, जि. बीड) यांच्या राहत्या घरावर कारवाई करण्यात आली. यावेळी आरोपीने विनापरवाना महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखू विक्रीच्या उद्देशाने बेकायदेशीररीत्या साठवून ठेवल्याचे आढळून आले. छाप्यात विमल केसरयुक्त गुटखा, डायरेक्टर पान मसाला, शॉट सुगंधित तंबाखू तसेच इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचे विविध पुडे असा हजारो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३२७/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २७४, २७५ व २२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस शिपाई गोविंद बाबासाहेब बाबरे (ब. नं. १९४७), पोलीस ठाणे माजलगाव ग्रामीण यांच्या फिर्यादीवरून करण्यात आली असून, पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस करीत आहेत.

# जाफराबाद-जळगाव बससेवा तातडीने सुरू करण्याची व्यापारी व नागरिकांची मागणी

**जाफराबाद । सत्यवादी**

जाफराबाद ते जळगाव ही एसटी बससेवा पुन्हा सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी जाफराबाद शहरातील व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सध्या या मार्गावर थेट एसटी बससेवा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत असून, त्यामुळे आर्थिक भुर्दंड तसेच वेळेचा अपव्यय होत आहे. जळगाव येथे शिक्षण,




नोकरी, शासकीय कामे, व्यवसाय आणि वैद्यकीय उपचारांसाठी दररोज मोठ्या संख्येने प्रवासी ये-जा करतात.

व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, जाफराबाद-जळगाव बससेवा सुरु झाल्यास प्रवाशांची मोठी सोय होईल. तसेच जाफराबाद आगाराच्या उत्पन्नातही वाढ होण्यास मदत होईल. त्यामुळे ही बससेवा लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

याबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक निर्णय घेऊन जाफराबाद-जळगाव बससेवा तातडीने सुरू करावी, अशी अपेक्षा व्यापारी व नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# विज मंडळास भ्रमणध्वनी न उचलण्याची ॲलर्जी



**धारूर । सत्यवादी**

महावितरण विज महामंडळास ग्राहकाचा भ्रमणध्वनी न उचलण्याची लर्जी झाल्याचे दिसून येत आहे.तालुक्यातील ग्राहकांना महावितरण वीज महामंडळा बाबत काही तक्रारी असल्यास त्या आलेल्या तक्रारींचे निदान करण्यासाठी संबंधित मंडळाने फ्युज कॉलसेंटर ची व्यवस्था केली आहे.या फ्युज कॉल सेंटर वर ज्या कर्मचा-याची ड्युटी आसते तो कर्मचारी ग्राहकांच्या आलेल्या समस्या, तक्रारींचे निवारण करणे बंधनकारक आहे ,मात्र संबंधित कर्मचारी , फ्युज कॉलसेंटर वर आलेल्या तक्रारींचे समस्याचे निदान करणे सोडाच पण आलेले कॉल सूध्दा उचलत नसल्याने ग्राहाकांतुन नाराजीचा सुर निघत आसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

महावितरण विज महामंडळा कडुन तालूक्यात विजेचा लपंडाव दर तास अर्ध्या तासाला चालु आहे,ब-याच डि पी उघड्यावर आहेत तर जीर्ण झालेल्या विद्युत तारा लोंबकळत असून थोडीही हवा आली किंवा पक्षी विद्युत तारा वर बसले तर पार्किंग होऊन आपघात झाले असल्याचे दिसून आले आहे,या बाबतीत ग्राहकांनी संबंधित फ्युज कॉलसेंटर ला कॉल केला तर संबंधित कर्मचारी तो कॉल उचलत नाही, दुस-या वेळी व्यस्त दिसुन येत असल्याने ग्राहक महावितरण विज महामंडळाच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली तर ते क्षेत्र आमच्या कडे नाही असे उडवा -उडवीचे उत्तर देवून मोकळे होतात या मुळे ग्राहकांना नाहक त्रास होत असल्याचे दिसून येते आहे. महावितरण विज महामंडळा कार्यालयात कंत्राटी कामगार यांची भरणा जास्त असून ते कामगार ग्राहकांना उडवा- उडवीचे उत्तर देत असुन यांच्या कडे संबंधित अधिकारी यांनी लक्ष देवून ग्राहकांची होणारी गैरसोय थांबवावी अशी ग्राहकां कडुन मागणी होत आहे.

# मूत्रपिंडाच्या रुग्णांना शासकीय रुग्णालय ठरतेय आधार

**नांदेड । सत्यवादी**




**कोणत्याही टप्प्यावरील मूत्रपिंडाच्या आजाराने जस्त असलेल्या रुग्णांसाठी विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय मोठा आधार ठरले आहे. दोन्ही मूत्रपिंड निकामी झालेल्या एका ५३ वर्षीय रुग्णांवर अतिशय मोठी जोखीम स्विकारून डॉक्टरांनी नुकतीच किचकट अशी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली आणि रुग्णाला ऑवदान दिले. त्यामुळे येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांविषयी आपुलकीची भावना निर्माण झाली आहे.**

मूत्रपिंडाशी संबंधित गंभीर आजार झाल्यास रुग्ण सहसा खाजगी रुग्णालय गाठले जाते. पण आता मूत्रपिंडाच्या कोणत्याही स्टेजवर असलेले रुग्ण शासकीय रुग्णालयात हमखास बरे होत आहेत. नुकताच असाच एक सुखद अनुभव विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव बव्हाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आला. हिमायतनगर तालुक्यातील शिवाजी पाटील (नाव बदले आहे) या रुग्णाचे मूत्रपिंड पूर्णतः खराब झाले, तर दुसरे मूत्रपिंड २० टक्के फेल झाले होते. शिवाजीची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने नातेवाईकांनी त्याला सरळ नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. Obstructive uropathy म्हणजे लघवीच्या मार्गात अडथळा

अतिशय जोखीम असलेल्या किचकट शस्त्रक्रियेनंतर रुग्ण झाला ठणठणीत

**मेडिसीन व सर्जरी विभागाचा समन्वय फळाला**

शिवाजीची तब्येत अत्यंत नाजूक होती. कोणतीही शस्त्रक्रिया करण्याची अवस्था नव्हती. औषधवैद्यकशास्त्र विभागातील किडनीविकार तज्ज्ञ डॉ. कपिल मोरे, सहायक प्राध्यापक डॉ. मोहन भंडारे यांनी डावलीसीस करून रुग्ण नॉर्मल केल्यामुळे रुग्णावर ऑपरेशन करता आले. निष्णात सर्जन डॉ. विद्यासागर केळकर, डॉ. संदीप चव्हाण यांनी अतिशय जोखीम असलेली मूत्रपिंडावर शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली.

निर्माण झाल्याने मूत्रपिंडाचे कार्य बंद पडण्याची स्थिती होती. तसेच रक्तातील पोटेशियम वाढल्यामुळे हृदयाच्या ठोक्यांमध्ये गंभीर बिघाड होऊ दम लागत होता. त्याला श्वासही घेणे अवघड होते. रुग्णाची गंभीर परिस्थिती पाहून अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय कापसे यांनी रुग्णाची पाहणी करून उपचाराबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर औषध वैद्यकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. शीतल राठोड, पथक प्रमुख सहयोगी प्राध्यापक डॉ. कपिल मोरे, वरिष्ठ निवासी डॉक्टर डॉ. सुरज चव्हाण, डॉ. फरूकी रफे, सहायक प्राध्यापक डॉ. मोहन भंडारे, डॉ. देविदास बंटेवाड, किडनीविकार तज्ज्ञ डॉ. आकाश पवार, डॉ. आयुषी पायधन, डॉ. अभिजीत कदम यांनी जातीने उपचार केले. रुग्णाची सीटी स्कॅन, एमआरआय डायलीसीस केले. मेडिसीन विभागाने रुग्णाची गंभीर परिस्थिती ओळखून अनेकवेळा शिवाजीची केस क्रिटिकल होती, शासकीय रुग्णालयातही अतिशय अवघड आणि जोखमीचे ऑपरेशन होतात, हेच या शिवाजीच्या केसने स्पष्ट केले. रुग्णांनी शासकीय

**रुग्णालयात उपचार घ्यावेत,**
**- डॉ. सुधीर देशमुख, अधिष्ठाता**

डायलीसीस प्रक्रिया केल्यामुळेच रुग्ण ऑपरेशनसाठी तयार करता आला. रुग्णावर केवळ उपचारच केला नाही तर, रुग्ण आणि नातेवाईकांना धौरही दिला. कुटुंबप्रमुख असलेल्या रुग्ण शिवाजीची ऑपरेशननंतर प्रकृती सुधारत आहे. ऑपरेशननंतर रुग्ण बरा होत असल्याने रुग्ण आणि नातेवाईकांनी रुग्णालयातील डॉक्टरांच्या टिमला धन्यवाद दिले.

# पंढरीच्या वाटेवर भक्तीचा जल्लोष! पंढरपूर यात्रेत महाप्रसाद व वारकऱ्यांची आरोग्य शिबीर सेवा

## बिलोली तालुक्यातील ३०० कार्यकर्ते नातेपुतेच्या वारकऱ्यांच्या दिशेने रवाना

**नांदेड । सत्यवादी**

आषाढी एकादशी निमित्त व पंढरपूर यात्रेला वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो भाविक व वारकऱ्यांच्या सेवेसाठी बिलोली तालुक्यातील कासराळी येथील भागवत लोकमनवार व सगरोळी येथिल गंगाधर शक्करवार यांच्या पुढाकारातून सातारा जिल्ह्यातील नातेपुते येथे दि.१८, १९, आणि २० जुलै दरम्यान मोफत सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवा हीच ईश्वरभक्ती' या भावनेतून वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यामधे वारकऱ्यांसाठी सकाळी नाश्ता व चहा, लहान मुलांसाठी दुधाची व्यवस्था, शुद्ध व सात्त्विक महाप्रसाद, तसेच मोफत आरोग्य तपासणी व प्रथमोपचार सुविधा उपलब्ध असतील. आपत्कालीन परिस्थितीसाठी २४ तास रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात येणार आहे. सलग पायी चालल्यामुळे होणारा शारीरिक थकवा दूर करण्यासाठी सेवाभावी कार्यकर्त्यांकडून अभ्यंग सेवा (फूट मसाज) देण्यात येणार असून, वारकऱ्यांना आराम मिळावा हा या उपक्रमा मागील मुख्य उद्देश आहे.

वारी ही परंपरा नाही तर आमचा श्वास आहे, हा संदेश देत लोकमनवार व शक्करवार मित्र मंडळ, बिलोली मित्र मंडळाने सर्व वारकरी बांधवांना या सेवा शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही सेवाभावातून हा उपक्रम राबविण्यात येत असून, वारकर्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा असल्याची भावना मंडळाच्या पदाधिकार्यांनी व्यक्त केली. हे वारकरी पंरपरेतील सेवा व समर्पण आणि भक्ती भावाचे उदाहरण ठरले आहे.

# खळीच्या स्मशानभूमीतील शेड जीर्णावस्थेत; पावसाळ्यात अंत्यसंस्कारासाठी नागरिकांची गैरसोय

**गंगाखेड । सत्यवादी**

गंगाखेड तालुक्यातील खळी येथील स्मशानभूमीतील शेड सध्या जीर्णावस्थेत असून ते कोसळण्याच्या स्थितीत आले आहे. त्यामुळे पावसाळ्यात अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

गावातील स्मशानभूमीतील शेड अनेक वर्षांपासून दुरुस्तीअभावी मोडकळीस आले आहे. पावसाच्या दिवसांत अंत्यविधी करताना पावसापासून संरक्षण मिळत नसल्याने नातेवाईकांसह ग्रामस्थांची गैरसोय होते. त्यामुळे या शेडची तातडीने दुरुस्ती करावी किंवा नवीन शेड उभारण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

याबाबत संबंधित ग्रामपंचायत व प्रशासनाने तातडीने पाहणी करून आवश्यक निधी उपलब्ध करून



स्मशानभूमीतील शेडचे काम हाती घ्यावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. ग्रामस्थांच्या दृष्टीने ही अत्यावश्यक सुविधा असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# आरणगाव ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा उत्साहात

**केज । सत्यवादी**



केज तालुक्यातील आरणगाव येथून ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ यांच्या कुशल नेतृत्वाखाली तसेच परमपूज्य राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या कृपाशीर्वादाने आणि व्याकरणाचार्य ह.भ.प. लाड गुरुजी यांच्या आशीर्वादाने श्रीक्षेत्र पंढरपूरकडे निघालेला पायी दिंडी सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात सुरू आहे.

दिनांक १५ जुलै २०२६ रोजी आरणगाव येथून प्रस्थान केलेली ही दिंडी मजल-दरमजल करीत काल भूम येथे मुक्कामी होती. यावेळी रात्री ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ यांचे पायी वारी या विषयावर सविस्तर हरिकीर्तन झाले. कीर्तनामध्ये महाराजांनी संतसंगतीचे महत्त्व विशद करत, प्रत्येकाने भगवंताची मनोभावे सेवा करावी, जीवनात अहंकाराचा त्याग करून परस्परांमध्ये प्रेम, आपुलकी आणि सहकार्याची भावना जोपासावी, तसेच शक्य असेल तेव्हा पायी वारी करून विठ्ठलभक्तीचा अनुभव घ्यावा, असा मोलाचा संदेश दिला. या पायी दिंडी सोहळ्यात आरणगावसह परिसरातील मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले असून संपूर्ण मार्गावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दिंडीच्या प्रत्येक मुक्कामी भाविकांसाठी भोजन, निवास व इतर आवश्यक सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. आरणगावचे ग्रामदैवत गिरीजाशंकर यांच्या कृपेने तसेच समस्त ग्रामस्थांच्या सहकार्याने हा दिंडी सोहळा यशस्वीपणे सुरू आहे. या पायी दिंडीचे हे दुसरे वर्ष असून दिंडीचे प्रमुख राम सोनवणे, प्रमुख सहकारी बबन इथापे व वसंत शिरसाठ तर, दिंडीचे नेतृत्व ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ करत आहेत. अधिक माहितीसाठी ९११२८८१२५२ किंवा ९५४५८२८५९१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन ह.भ.प. नारायण महाराज शिरसाठ यांनी केले आहे.

# वाढदिवसाचा अनोखा आदर्श; मुलाचा वाढदिवस अनाथ बालकांसोबत साजरा; शालेय साहित्य व जेवणाचे वाटप

- आष्टीच्या व्यापारी प्रितम बोगावत यांचा सामाजिक उपक्रम
- निवारा बालगृहातील ८० विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद

**आष्टी । सत्यवादी**

आजच्या आधुनिक काळात वाढदिवस म्हणजे महागडी हॉटेल्स, आकर्षक डेकोरेशन, मोठमोठे केक आणि दिमाखदार सेलिब्रेशन, अशीच सर्वसाधारण धारणा झाली आहे. मात्र समाजाप्रती असलेली संवेदनशीलता जपत आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत आष्टी येथील व्यापारी प्रितम बोगावत यांनी आपल्या मुलाचा वाढदिवस एका वेगळ्याच पद्धतीने साजरा करून समाजासमोर अनुकरणीय आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून वाढदिवसाच्या या अनोख्या सेलिब्रेशनची चांगलीच चर्चा रंगली आहे.

शनिवार (दि. १८) रोजी ग्रामीण विकास केंद्र संचलित निवारा बालगृह, जामखेड येथे आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त बोगावत परिवाराने भेट देत तेथील विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण वाटले. यावेळी बालगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच सर्व मुलांना गोड जेवण देऊन त्यांच्यासोबत वाढदिवस साजरा करण्यात आला. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे बालगृहातील मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

जामखेड येथील या निवारा बालगृहात भटक्या-विमुक्त समाजातील अनाथ मुले, ऊसतोड कामगार मुले , विटभट्टी मजुराची मुलं तसेच अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेणारी सुमारे ८० मुले वास्तव्यास आहेत. अशा विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा करून बोगावत परिवाराने केवळ आनंदच वाटला नाही, तर सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीवही समाजासमोर अधोरेखित केली.



याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. अरुण जाधव, विजय बोगावत, वैजीनाथ केसकर, संतोष चव्हाण, मुर्शदपूर ग्रामपंचायत सदस्य अक्षय हळपावत, श्रवण पांडे, तसेच प्रितम बोगावत यांच्यासह बोगावत परिवारातील सदस्य उपस्थित होते.

वाढदिवस हा केवळ उत्सव न राहता समाजातील गरजू आणि वंचित मुलांच्या आयुष्यात आनंदाचा क्षण निर्माण करण्याचे माध्यम ठरू शकतो, याची प्रचिती प्रितम बोगावत यांच्या या उपक्रमातून आली. त्यांच्या या सामाजिक जाणिवेच्या कृतीचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, इतरांनीही अशा उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्याची प्रेरणा घ्यावी, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सकल मातंग समाजाची आक्रमक मागणी

## अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणासाठी ना.पंकजाताईंना निवेदन

**अंबाजोगाई । सत्यवादी**



सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा ऐतिहासिक निर्णय देत राज्य सरकारांना याचे अधिकार प्रदान केले आहेत. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र सरकारने निवृत्त न्यायाधीश अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने अनुसूचित जातीतील आरक्षणाचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचला आहे किंवा नाही आणि उपवर्गीकरण कसे असावे, याचा सखोल अभ्यास करून आपला अहवाल महाराष्ट्र शासनाकडे सादर केला आहे. मात्र, या अहवालावर अद्याप कोणतीही ठोस चर्चा झालेली नाही आणि अंमलबजावणी रखडली आहे. या पार्श्वभूमीवर, आरक्षणाचा लाभ वंचित जातींपर्यंत पोहोचवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर सकल मातंग समाजाच्या वतीने मोर्चे, निदर्शने आणि आंदोलनांचे सत्र सुरू आहे. याच मालिकेचा एक भाग म्हणून, आज बीड जिल्हाभरातून आलेल्या सकल मातंग समाजाच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने मंत्री महोदयांशी आरक्षण उपवर्गीकरणाच्या विषयावर

(पान २ वर...)

# प्रवाशांच्या सेवेसाठी एसटीचे एक पाऊल पुढे; जिल्हा रुग्णालय येथे अधिकृत थांबा सुरू

**बीड नगरपरिषद किंवा बी अँड सी ने थांब्यावर पत्र्याचे शेड उभारावे – एस.एम.युसूफ**



**बीड । सत्यवादी**

प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळावी म्हणून बीडच्या एसटी विभागाने एक पाऊल पुढे टाकत बार्शी रोडवर जिल्हा रुग्णालय आणि शिवाजीनगर पोलीस ठाणे लगत अधिकृत बस थांबा सुरू केला आहे. येथे बार्शी रोड आणि तेलगाव रोड कडे जाणाऱ्या सर्व गाड्या थांबणार असून यासाठी एक वाहतूक नियंत्रकाची नेमणूक ही करण्यात आली आहे. एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रक सौ. अनुजा दुसाने यांनी हा थांबा कार्यान्वित करण्यासाठी विशेष कार्य केले आहे. एसटी महामंडळाने हा अधिकृत थांबा सुरू करून प्रवाशांची सोय केली असून आता ऊन, वारा, पाऊस यापासून प्रवाशांना त्रास होऊ नये याकरिता बीड नगरपरिषद किंवा बी अँड सी ने येथे पत्र्याचे शेड उभारणे

(पान २ वर...)

# छाया ते मुस्कान; जिल्हा रुग्णालयात प्रसूतीदरम्यान माता मृत्यूंची मालिका; दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा!

- २४ कोटींच्या माता–बाल रुग्णालयातील अनागोंदी, लिफ्ट बिघाड व गळतीप्रकरणीही चौकशीची मागणी
- सोमवारी आंदोलनाचा इशारा – डॉ.गणेश ढवळे

**बीड । सत्यवादी**




बीड जिल्हा रुग्णालयातील प्रसूतीदरम्यान झालेल्या मातामृत्यूंच्या घटनांबाबत संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, तसेच माता व बाल रुग्णालयातील विविध त्रुटींची सखोल चौकशी



करून दोषींवर कारवाई करावी, या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव व आरोग्य सेवा संचालनालयाकडे लेखी तक्रार केली आहे. या मागण्यांसाठी दि. २० जुलै (सोमवार) रोजी जिल्हा रुग्णालय परिसरात आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

डॉ. ढवळे यांनी निवेदनात आरोप केला आहे की, जिल्हा रुग्णालयातील कथित

(पान २ वर...)

# माजलगाव नगराध्यक्षांच्या जातवैधता प्रमाणपत्राला उच्च न्यायालयात आव्हान

**परळी। सत्यवादी**

माजलगाव नगरपालिकेच्या नगराध्यक्ष शिफा बिलाल चाऊस यांच्या जातवैधता प्रमाणपत्राला माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात रिट याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. या प्रकरणामुळे माजलगावच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली असून, न्यायालयाने प्राथमिक सुनावणीनंतर संबंधित प्रतिवादींना नोटिसा बजावण्याचे आदेश दिले आहेत.

खलील पटेल व इतर याचिकाकर्त्यांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेत नगराध्यक्ष शिफा बिलाल चाऊस यांचे जातवैधता प्रमाणपत्र चुकीच्या व खोट्या आधारावर मिळविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. याचिकेनुसार, जातवैधता प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली कायदेशीर व पूरक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सादर करण्यात आलेल्या काही कागदपत्रांच्या सत्यतेबाबतही शंका उपस्थित करण्यात आली असून, या संपूर्ण प्रक्रियेची न्यायालयीन तपासणी होणे आवश्यक असल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

याचिकाकर्त्यांनी विविध कायदेशीर मुद्द्यांच्या आधारे संबंधित जातवैधता प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी न्यायालयाकडे केली आहे. या प्रकरणात ड. शरद सोळंके यांनी याचिकाकर्त्यांची बाजू

(पान २ वर...)

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा!

**सोमवारी शरदचंद्र पवार पक्षाचे धरणे आंदोलन – राजेंद्र मस्के**

**बीड । सत्यवादी**



देशात छएएढ परीक्षेचा पेपरफुटीचा प्रकार घडल्यानंतर जवळपास २० हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देणे आवश्यक होते. परंतु, दुर्दैवाने तसे घडले नाही. विद्यार्थी व युवकांच्या न्याय्य मागण्यांबाबत सरकारची भूमिका निराशाजनक आहे. राज्यातील विद्यार्थी व युवकांच्या विविध प्रश्नांकडे केंद्र सरकारने सातत्याने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने सोमवार,

(पान २ वर...)

# किरण गित्ते आयएएस यांची मुख्यमंत्र्यांचे सचिव पदी नियुक्ती

**परळी । सत्यवादी**



परळी तालुक्यातील सुपुत्र आणि त्रिपुरा केडरचे वरिष्ठ सनदी अधिकारी श्री. किरण गित्ते ख–ड यांच्यावर त्रिपुरा सरकारने अत्यंत मोठी आणि महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. त्रिपुराच्या राज्यपालांच्या आदेशानुसार प्रशासकीय सेवेतील हा मोठा फेरबदल करण्यात आला असून, त्रिपुरा सरकारचे अवर सचिव जे. दत्ता यांच्या स्वाक्षरीने हे अधिकृत आदेश जारी करण्यात आले आहेत.

या नव्या नियुक्तीनुसार श्री. किरण गित्ते ंच्याकडे आता थेट राज्याच्या मुख्यमंत्री सचिवालयाचा मुख्य कार्यभार सोपवण्यात आला असून, त्यासोबतच सार्वजनिक बांधकाम विभाग , आरोग्य आणि कुटुंब कल्याण, माहिती व संस्कृती , सुशासन

(पान २ वर...)

# योजना वारीद्वारे शासकीय योजना व पंचायतराज व्यवस्थेची जनजागृती

**धारूर । सत्यवादी**




ग्रामऊर्जा ह्युमन डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या वतीने आयोजित योजना वारी उपक्रमांतर्गत गावात शासकीय योजनांची माहिती तसेच पंचायतराज व्यवस्थेविषयी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती, पात्रता, अर्ज प्रक्रिया व लाभ याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ग्रामसभा, ग्रामपंचायत आणि पंचायतराज व्यवस्थेतील नागरिकांची भूमिका, अधिकार व जबाबदाऱ्या याविषयी माहिती देण्यात आली.यावेळी पंचायतराज व्यवस्थेमध्ये गावकऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढवून ग्रामविकासाला गती देणे, ग्रामसभेला सक्षम बनविणे आणि शासकीय योजनांचा

(पान २ वर...)




# आ.सुरेश धस यांच्या पुढाकारातून विजयकुमार गवळी यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ५० हजारांची मदद



**पाटोदा । सत्यवादी**

वैद्यकीन्ही (ता. पाटोदा) येथील शेतकरी कुटुंबातील विजयकुमार गवळी हे मेंदूच्या गंभीर आजारावर बार्शी येथील भगवंत हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. उपचारासाठी मोठा आर्थिक खर्च अपेक्षित असल्याने कुटुंबासमोर गंभीर आर्थिक संकट उभे राहिले होते. अशा कठीण परिस्थितीत त्यांनी लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्याशी संपर्क साधला.

रुग्णाची परिस्थिती लक्षात घेऊन आमदार सुरेश आण्णा धस यांनी तातडीने आपल्या वैद्यकीय रुग्ण मदत विभागाचे सहाय्यक ड. महेश बेद्रे यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पाटोदा येथील स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी आमदार धस यांचे शिफारसपत्र तयार केले. त्यानंतर ड. महेश बेद्रे यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून भगवंत हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाशी समन्वय साधत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीसाठीची ऑनलाइन प्रक्रिया तातडीने पूर्ण करून घेतली. अवघ्या दोन दिवसांत संपूर्ण प्रस्ताव तयार करून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला.

यानंतर मुंबई येथील मुख्यमंत्री

(पान २ वर...)




# मुख्यमंत्री फडणवीसांच्या ४८ हजार कोटींच्या कृषी वीजबील दिलासा निर्णयाचे स्वागत–शंकर देशमुख



**बीड । सत्यवादी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत राज्यातील शेतकरी बांधवांसाठी सुमारे ४८ हजार कोटींच्या थकीत कृषी वीजबिलांना दिलासा देण्याचा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागत केले आहे.

प्रसिद्धीपत्रकात देशमुख म्हणाले की, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत ७.५ एचपीपर्यंतच्या कृषी पंपधारक शेतकऱ्यांच्या थकीत वीजबिलांबाबत सुमारे ४८ हजार कोटींचा दिलासा देण्याचा निर्णय हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. यामुळे लाखो शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक भार कमी होईल आणि शेतीला नवी ऊर्जा मिळेल.

देशमुख पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कारकिर्दीत शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून त्यावर ठोस निर्णय घेण्याची त्यांची कार्यपद्धती राज्यातील कृषी क्षेत्रासाठी दिलासादायक ठरली आहे.

४८ हजार कोटींच्या कृषी वीजबिल दिलासा निर्णयामुळे राज्यातील सुमारे

(पान २ वर...)




This newspaper is published by **Shaikh Rehan Shaikh Feroz** from H.No.3-1-292, Imampur Road, Dhole Wasti, Beed, Maharashtra - 431122 on behalf of Shaikh Rehan Shaikh Feroz, edited by Shaikh Rehan Shaikh Feroz and printed by Abdul Raheman Yusuf Shaikh at Nirmitee Prints, Old Bhaji Market, House No.2-1-54, In Front of Bank of Badoda, Subhash Road, Beed, Maharashtra - 431122.
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com**

**हे पत्र मालक, प्रकाशक शेख रेहान शेख फेरोज यांनी निर्मिती प्रिंट्स, जुनी भाजी मार्केट, घर क्र.२–१–५४, बँक ऑफ बडोदा समोर, सुभाष रोड, बीड ता.जि.बीड महाराष्ट्र – ४३११२२ येथे छापून दैनिक आपल्या लोकांचा सत्यवादी कार्यालय इमामपुर रोड, बीड येथे प्रसिद्ध केले.**
**Mob. 9822728340 | Email : dailysatyawadi@gmail.com | Website : www.esatyawadi.com ✲ संपादक : शेख रेहान शेख फेरोज**